# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**(महाडीबीटी नोडल अधिकारी तथा उपकुलसचिव, विद्या विभाग यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**डॉ. दिपक एस. जुनघरे**
(एम.कॉम. एल.एल.बी., पीएचडी)
उपकुलसचिव

संकेतस्थळ :www.unigug.ac.in
ई.मेल :gug.registrar@gmail.com
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०४


जावक क्रमांक/गो.वि./महाडीबीटी/७२६/२०२१

दिनांक : ०४/०६/२०२१

## परीपत्रक

**विषय – सन 2020-2021 करीता महाडीबीटी पोर्टलवरून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधीत अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरून पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ – मा. संचालक कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य 2020-21/डिबीटी/6602 दिनांक 01.06.2021

उपरोक्त मा.संचालक कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू शिष्यवृत्ती योजनांसाठी शैक्षणिक वर्ष 2020-21 करीता पात्र असुनही अद्याप अर्ज केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज करण्यासाठी दि. 30.06.2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सन 2020-21 या शैक्षणिक वर्षाकरीता विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसुन, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी सर्व संलग्नीत महाविद्यालयांना कळविण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज दररोज निकाली काढणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत अर्ज प्रलंबीत ठेवू नयेत. प्रलंबीत राहीलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधीत महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहीती नमुद करून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टिटयुट लॉगीन वरून उपस्थिती बाबतची माहीती नमुद करून शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधीत विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेचे वितरण होत नाही.

तसेच उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ वितरण सुरू झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करून त्यांचे अर्जाची स्थिती तपासावी. डिडीओ द्वारे लाभ वितरित केल्यास रिडीम बटण सक्रीय होते. शिष्यवृत्ती मंजुर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खात्याशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी त्वरित बँक खात्याशी आधार संलग्न करावे.

महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहीती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासुन वंचीत राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(डॉ. दिपक एस. जुनघरे)
नोडल अधिकारी महाडीबीटी तथा
उपकुलसचिव (विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सोबत – संदर्भीय पत्र

Scanned with CamScanner